लोकमत

# विद्यार्थ्यांकडून सायबर जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च वर्ये यांच्यावतीने 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या प्रकल्पाअंतर्गत विद्यार्थ्यांनी रयत सेवक को. ऑप. सेवक बँक यांच्या समवेत मास ॲक्टिव्हिटी आयोजित केली.

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमाचा उद्देश म्हणजे लोकांमध्ये सायबर जनजागृती निर्माण करणे, वेगवेगळ्या सायबर गुन्ह्यांची माहिती करून देणे तसेच त्या गुन्ह्यांपासून कसे सुरक्षित राहिले पाहिजे, याची माहिती करून देणे. यासाठी विद्यार्थ्यांनी रयत को. ऑप. सेवक बँक ग्राहक मेळाव्यात रयत सेवकांना व ग्राहकांना सायबर सुरक्षेचे धडे दिले. यामध्ये विद्यार्थ्यांनी नाटिकेद्वारे विविध सायबर गुन्ह्यांची माहिती करून दिली तसेच आजकालच्या ऑनलाइन युगामध्ये होणारे सायबर गुन्हे कसे रोखता येतील, याबद्दल माहिती दिली. विविध बँकिंग घोटाळे कशाप्रकारे होतात, आपण त्यामध्ये कसे अडकलो जातो, कोणत्या गोष्टी करायला हव्यात आणि कोणत्या गोष्टी टाळायला पाहिजेत, याची माहिती दिली.